सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# नेपाळमध्ये २८९ मृतदेह सापडले:१५०० जणांचा शोध, २८८ भारतीय बेपत्ता

## वाचवलेल्या २१ भारतीयांपैकी ११ ची ओळख पटली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नेपाळ–तिबेट**

बुधवारी सकाळी नेपाळ–तिबेट सीमेवर आलेल्या अचानक आलेल्या पुराच्या तडाख्यानंतर आतापर्यंत २८९ मृतदेह सापडले आहेत. सुमारे १,५०० लोक अजूनही बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये नेपाळी नागरिकांसोबतच मोठ्या संख्येने परदेशी नागरिकांचाही समावेश आहे. नेपाळमध्ये लष्कर, पोलीस आणि सशस्त्र पोलीस पथके बेपत्ता झालेल्यांचा सतत शोध घेत आहेत. पूरग्रस्त भागात अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टर आणि इतर साधनांच्या साहाय्याने सुरक्षित स्थळी हलवले जात आहे.भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, नेपाळमधील २८८ भारतीय नागरिकांशी अद्याप संपर्क झालेला नाही. यापैकी ७३ जण त्रिशुली–१ वीज प्रकल्पात काम करतात. पुरात अडकलेल्या २१ भारतीयांना सुखरूप बाहेर काढण्यात आले असून, त्यापैकी ११ जणांची ओळख पटली आहे. नेपाळमधील रसुवाजवळ त्रिशुली नदीला आलेल्या



### ■ भारत नेपाळला बेली ब्रिज पाठवणार

– पुरामुळे खराब झालेले रस्ते आणि पूल दुरुस्त करण्यासाठी भारत नेपाळला बेली ब्रिज पाठवणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, हा एक पोर्टेबल आणि पूर्वनिर्मित पूल आहे, जो आवश्यक ठिकाणी त्वरित उभारला जाऊ शकतो. जेव्हा पूर किंवा भूस्खलनामुळे पूल उद्ध्वस्त होतो, तेव्हा बेली ब्रिज रस्त्यांची जोडणी त्वरित पूर्ववत करण्यास मदत करतो. गरजेनुसार तो हलवून पुन्हा स्थापितही केला जाऊ शकतो.

महापुरानंतर, आतापर्यंत ८ जिल्ह्यांतून २८९ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. ही आकडेवारी दुपारी ३ वाजेपर्यंतची आहे. चितवनमध्ये सर्वाधिक १२१ मृतदेह सापडले आहेत. त्याखालोखाल पूर्व नवलपरासी (६५), धादिंग आणि गोरखा (प्रत्येकी २९), तनहुन (१६), नुवाकोट (१२), पश्चिम नवलपरासी (१४) आणि रसुवा (३) यांचा क्रमांक लागतो.

त्रिशुलीमध्ये हेलिकॉप्टरद्वारे बचाव आणि मदत कार्य सुरूच

पुराच्या पार्श्वभूमीवर नेपाळच्या त्रिशुली प्रदेशात मदत आणि बचाव कार्य तीव्र झाले आहे. खराब झालेले रस्ते आणि इतर मार्गांमुळे अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टरद्वारे बाहेर काढले जात आहे. बचावलेल्या लोकांना हेलिकॉप्टरद्वारे त्रिशुली बाजारात नेले जात आहे. लष्करी आणि खाजगी हेलिकॉप्टरच्या मदतीने आतापर्यंत १०० हून अधिक लोकांना पूरग्रस्त भागातून बाहेर काढण्यात आले आहे.

# नेपाळच्या महापुरात महाराष्ट्रातील पर्यटकांची चिंता वाढली:८० जण गेले, फक्त चौघांशीच संपर्क

## गिरीश महाजनांचे आवाहन– ‘नातेवाईकांची माहिती तातडीने द्या’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई–** नेपाळ–तिबेट सीमेवर आलेल्या भीषण महापुरामुळे मोठी जीवितहानी झाली असून, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्या भारतीय पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारनेही आपली यंत्रणा सतर्क केली आहे. महाराष्ट्रातून नेपाळला गेलेल्या सुमारे ८० पर्यटकांची माहिती राज्य सरकारकडे आली असून, त्यापैकी आतापर्यंत केवळ चार जणांशी संपर्क होऊ शकला आहे, अशी माहिती राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्रातील नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांची संख्या याबाबत सुरुवातीला वेगवेगळे आकडे समोर येत आहेत. राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने सध्या ८० पर्यटकांचा मागोवा घेण्याचे काम सुरू केले आहे. त्यापैकी चार जण सुरक्षित असल्याची खात्री झाली असून, उर्वरित पर्यटकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.




त्यामुळे नागरिकांनी आपल्या नातेवाईकांची किंवा परिचितांची माहिती प्रशासनाला देण्याचे आवाहन गिरीश महाजन यांनी केले आहे.

नेपाळमधील परिस्थिती बाबत पत्रकारांशी संवाद साधताना गिरीश महाजन यांनी सांगितले की, रिचा टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या दोन वाहनांमधून महाराष्ट्रातील पर्यटकांसह सुमारे ८० जण मानसरोवरच्या दिशेने गेले होते.

यापैकी आतापर्यंत चार जणांशी संपर्क झाला आहे. हे चार जण सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे.मात्र, या गटातील इतर नागरिकांची नेमकी स्थिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. या वाहनांमध्ये महाराष्ट्राबरोबरच आंध्र प्रदेश आणि दक्षिण भारतातील अन्य राज्यांतील नागरिकही असल्याचे महाजन यांनी सांगितले. त्यामुळे या ८० जणांपैकी नेमके किती जण महाराष्ट्रातील आहेत, याचीही पडताळणी सुरू आहे.

# रिक्षा–टॅक्सीचालक मराठी भाषेचा मुद्दा

## सरनाईकांनी दिलेली मुदत मुख्यमंत्र्यांनी वाढवली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मुंबई–** अवघ्या दोन दिवसांपूर्वी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा–टॅक्सीचालकांना एक महिन्याची प्रारंभिक मुदत देण्याची घोषणा केली होती. त्यानंतर आवश्यक असल्यास पुढील तीन महिन्यांचा कालावधी देण्यात येईल, असे स्पष्ट केले होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रिक्षा–टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी गुरुवारी (२७ ऑगस्ट) एक वर्षाची मुदत दिल्यामुळे आता त्यांच्यावरची कारवाई टळली आहे. यामुळे दोन्ही पक्षांमध्ये रिक्षा–टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी मुदतवाढ देण्यावरून मतभेद असल्याचे स्पष्ट झाले आहे. रिक्षा–टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंत मुदत होती. त्यानंतरही



मराठी शिकलेले नसतील अशा चालकांवर १८ ऑगस्टपासून कारवाईला सुरुवात करण्यात आली होती. त्यावरून अमराठी रिक्षा–टॅक्सीचालकांमध्ये प्रचंड नाराजी होती.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणं अनिवार्य करण्याचा मुद्दा चर्चेत आहे. अमराठी रिक्षा–टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली होती. आता ही मुदत संपली आहे. रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा न आल्यास कारवाईचा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला होता. मात्र, अमराठी रिक्षा–टॅक्सी चालकांना आणखी काहीसा दिलासा देण्यात आला आहे.

या संघटनेने मराठी शिकण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. या एका वर्षात त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही. एक वर्षात अमराठी चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# तुकाराम मुंढेंच्या रडारवर राज्यातील अंगणवाड्या, आता तरी मुलांना पौष्टीक आहार मिळणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

अंगणवाड्यांमध्ये मुलांना पौष्टिक आहार मिळावा यासाठी आता तुकाराम मुंढे सज्ज झालेत. ऋऊ–च्या रडारवर आता अंगणवाड्या आहेत, तर गणेशोत्सवातला महाप्रसादावरही ऋऊ–ची नजर आहे.

निकृष्ट पोषण आहारावर एका अंगणवाडी सेविकेनं सवाल उपस्थित केल्यानंतर आता अंगणवाड्या अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढेंच्या रडारवर आलेत. ऋऊ–नं अंगणवाड्यामध्ये दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराकडे आणि




तिथल्या स्वच्छतेकडे आपलं लक्ष वळवलयं.

निकृष्ट दर्जाचे जेवण, भुंगे लागलेली कडधान्ये, खिचडीत आळ्या आढळणे आणि अन्नातील प्रचंड अस्वच्छता यांसारख्या गंभीर तक्रारींची दखल घेत एफडीने राज्यभर मोठ्या मोहिमेचा इशारा दिलाय. ऋऊ– आता दर महिन्याला राज्यातील अंगणवाड्यांमध्ये तपासणी मोहिम राबवणार आहे. जेणेकरून लहान मुलांच्या आरोग्याशी खेळण्याचा कुठलाच प्रकार घडणार नाही.

# सरोगसी बाळ ते अकलेचे तारे...शिंदेसेना–राष्ट्रवादी वाद उफाळला

## रायगडच्या राजकारणाला पुन्हा फोडणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ रायगड–** रायगड जिल्ह्यामध्ये मात्र शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यातील राजकीय वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. पालकमंत्रिपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीमधील वाद मिटला असला तरी दोन्ही पक्षातील वैमनस्य अजून मिटलं नाहीये. पालकमंत्रिपदामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षाच्या संबंधात कडूपणा आला होता. परंतु या दोन्ही पक्षामधील वादाचा दुसरा अंक आता सुरू झाल्याचं दिसत आहे. आता हा वाद आमदार अनिकेत तटकरे आणि शिवसेना नेते महेंद्र दळवी यांच्यात सुरू झालाय.

जवळपास दीड दोन वर्षांपासून पालकमंत्रिपदावरून शिवसेनेचे आमदार भरतशेठ गोगावले आणि सुनिल तटकरे यांच्यातील वाद सुरू होता. या वादावर मागील आठवड्यात पडदा पडला खरा, पण दोन्ही पक्षातील राजकीय संघर्ष कमी झाला नाहीये. अनिकेत तटकरे हे सरोगसी बाळ असल्याचा उल्लेख करत शिंदेसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी अनिकेत तटकरेंच्या आकलन टीकेला प्रत्युत्तर दिलंय.काही दिवसापूर्वी आमदार अनिकेत तटकरे यांनी काही दिवसापूर्वी महेंद्र दळवी यांच्यावर जोरदार टीका केली होती. शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांच्या अकलेची आणि त्यांच्या




आकलन शक्तीची कीव येते. स्वतःच्या फायद्यासाठी यांनी खासदार सुनिल तटकरे यांची मदत घेतलीय. मात्र आज तेच तटकरे साहेबांवर टीका करत आहेत.

विधानसभेच्या निवडणुकीत मदतीसाठी कितीवेळा तटकरे साहेबांकडे दळवी यांनी फेऱ्या मारल्या? काय काय केलं? हे सगळं माहिती आहे. जिल्हा परिषद निवडणुकीनंतर दळवींनी त्यांची पत्नी मानसी दळवी यांना जिल्हा परिषद अध्यक्षपद मिळावे, यासाठी तटकरे साहेबांकडे दिल्लीवाऱ्या केल्या असल्याचे सांगत आमदार अनिकेत तटकरे यांनी दळवींची पोलखोल केली होती.

अनिकेत तटकरे यांच्या टीकेला उत्तर देताना शिवसेना आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, अनिकेत तटकरे हे सरोगसी बाळ आहेत. कारण जर आम्ही फॉर्म काढला नसता तर लढाई होऊन आम्ही जिंकलो असतो, अनिकेत तटकरे यांचा राजकिय जन्म झालाच नसता. त्याचमुळे आमच्याविषयी अनिकेत तटकरे यांनी आकलेचे तारे तोडू नयेत, असा सल्ला दळवी यांनी त्यांना दिलाय. दळवी यांच्या या जहरी टिकेनंतर रायगडमध्ये शिंदे सेना आणि राष्ट्रवादीमध्ये पुन्हा राजकिय वाद पेटण्याची चिन्ह आहेत.

# MPSC पेपरफुटी प्रकरणात मोठी अपडेट आदर्श शिक्षक पुरस्कार विजेताच निघाला आरोपी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ नंदुरबार–** एमपीएससी औषध निरिक्षक पेपरफुटी प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. एमपीएससी पेपर फुटीचे धागेदोरे नंदुरबार जिल्ह्यापर्यंत पोहचले आहेत. कौटिल्य अक्ॅडमीचे संचालक प्रवीण पाटील आणि ऋतुजा पाटीलचे वडील अमृत पाटील यांच्यासोबतच ५ जणांना मुंबई पोलिसांनी अटक केली. ऋतुजा पाटील आणि तिचा प्रियकर दोघेही फरार होते. अखेर पोलिसांनी ऋतुजाचा प्रियकर गौरव पाटीलला देखील अटक केली. अमृत पाटील आणि गौरव पाटील यांची आज पोलिसांकडून चौकशी करण्यात आली.एमपीएससी पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आलं असून त्यांना आज सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं. सहाही आरोपींना न्यायालयाने २ तारखेपर्यंत पोलिस



कोठडी सुनावली. धक्कादायक बाब म्हणजे या प्रकरणातील आरोपी असलेले ऋतुजा पाटीलचे वडील अमृत पाटील आणि तिची आई नंदुरबार जिल्ह्यातील परिवर्धा जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होते. पाटील दांपत्यांना राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला होता.आरोपी अमृत पाटील हे नंदुरबार जिल्ह्यातील परिवर्धा जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. अमृत पाटील हे मुख्याध्यापक म्हणून तर त्यांच्या पत्नी उज्वला पाटील शिक्षक म्हणून परिवर्धा जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होते. अमृत पाटील यांच्यावर अटकेची कारवाई केल्यानंतर शाळेतील त्यांच्या सहकारी शिक्षकांनी भावना व्यक्त केली. अमृत पाटील यांच्या स्वभावाबद्दल त्याच्या सहकारी शिक्षकांनी माहिती दिली.

एमपीएससी पेपरफुटी प्रकरणात एक नवा ट्विस्ट समोर आला आहे. या प्रकरणात आणखी एक नवा चेहरा उघड झाला आहे. कौटिल्य अक्ॅडमीचे संचालक प्रवीण पाटील आणि ऋतुजाचे वडील अमृत पाटील यांच्यात पेपरफुटी प्रकरणात मध्यस्थी करणाऱ्या मयूर आबाजी ठाकरे यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अखेर भगवा दुपट्टा वादावर पडदा; शिवसेनेच्या आक्रमक पवित्र्यानंतर बाजार समिती संचालकांची हात जोडून जाहीर माफी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर–** कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर येथे भगवा दुपट्टा घालण्यासंदर्भात एका संचालकाकडून झालेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे निर्माण झालेला वाद अखेर मिटला आहे. शिवसेनेच्या आक्रमक भूमिकेनंतर संबंधित संचालकांनी आपले वक्तव्य चुकून झाल्याचे सांगत हात जोडून जाहीर माफी मागितली. त्यानंतर शिवसेनेने नियोजित आंदोलन मागे घेतले.काही दिवसांपूर्वी बाजार समिती परिसरात शेतकरी, हमाल व मापारी यांनी भगवा दुपट्टा घालू नये, असे वक्तव्य संबंधित संचालकाच्या तोंडून निघाल्याने



शेतकरी बांधव आणि शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या प्रकरणाचा निषेध करत शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी संबंधित संचालकांनी जाहीर माफी मागावी, अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.त्यानुसार बुधवारी शिवसेनेच्या वतीने रविभाऊ गणोरकर यांच्या घरापासून कृषी उत्पन्न बाजार समितीपर्यंत निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शिवसैनिकांनी आक्रमक भूमिका घेत बाजार समिती कार्यालयात ठिय्या दिला. वाढता रोष लक्षात घेऊन अखेर संबंधित संचालकांनी आपले वक्तव्य अनवधानाने झाल्याचे स्पष्ट केले.यापुढे बाजार समितीत कोणालाही भगवा दुपट्टा घालण्यास मनाई केली जाणार नाही तसेच सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल, असे आश्वासनही संचालकांनी दिले. जाहीर माफीनंतर शिवसेनेने आंदोलन मागे घेतले.यावेळी गोपाल पाटील अरबट, रविभाऊ गणोरकर, प्रदीप मलिए, गणेशराव लाजुरकर, मनोज पाटील गव्हाणे, महेंद्र भांडे, तुषार चौधरी, अतुल सगणे यांच्यासह शिवसेना, युवासेना व शेतकरी सेनेचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय ......

# वैचारिक भेसळ रोखण्याचे आव्हान

अन्न व औषध प्रशासन हा विभाग राज्यात सध्या सर्वाधिक चर्चेत आहे. अन्नातील भेसळीमुळे आयुष्याची काय अवस्था होते, ही भेसळ कशी होते, त्याचे काय परिणाम होतात हे तुकाराम मुंढे या विभागाचे आयुक्त झाल्यानंतर प्रकर्षाने सर्वांच्या लक्षात आले. त्यामुळे जो विभाग कधी चर्चेत नव्हता, ज्याकडे सहज दुर्लक्ष केले जायचे तो विभाग आता सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. कारण अन्न ही सर्वांची गरज आहे आणि त्यातील भेसळ म्हणजे थेट शारीरिक हानी असल्यामुळे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. तुकाराम मुंढे यांनी अन्न आणि औषधातील भेसळ रोखण्यासाठी आणि महाराष्ट्रातील प्रत्येकजण सुरक्षित राहावा, यासाठी 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहीम सुरू केली आहे. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे भेसळीचे उदाहरण अन्नाबाबत झाले. मात्र, विचारांच्या भेसळीचे काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण सोशल मीडियामुळे विचारांची, वैचारिक भेसळीचा धोका प्रचंड वाढला आहे. त्यामुळे ही भेसळ कशी रोखायची, याचा विचार करण्याची गरज आहे. आणि तेही तितकेच खरे की जे विचार करतील, बुद्धीचा वापर करतील ते तरतील आणि बाकीचे भेसळीच्या आहारी जातील.

अन्नातील भेसळीचा विचार केल्यास पहिले दुधाकडे पाहिले जाते. प्रत्येक घरात दूध विकत घेतले जाते. शिवाय दुधापासूनच चहा, पेढे, इतर मिठाई, दही, पनीर वगैरे तयार केले जाते. या दुधातच युरिया, डिटर्जंट, पीठ (स्टार्च) यांची भेसळ केली जाते जे आरोग्याला अत्यंत हानिकारक आहे. म्हणजे आरोग्यासाठी दूध उत्तम म्हणत आपण भेसळयुक्त दूध पितो, हे वास्तव आहे. दुधाप्रमाणे आपण बेसनाचे पीठ घेतले तर त्यातही लाखी डाळ, गव्हाचे पीठ, रंगासाठी मेटॅनिल येलोचा वापर केला जातो. एवढेच कशाला अगदी चहा पावडरमध्ये सुकवलेली जुनी पाने, लाकडाचा भुसा, कृत्रिम रंगाचा वापर केला जातो. हे अगदी सरसकट नसले तरी सुट्या मालामध्ये भेसळीची भीती जास्त असते. राज्यात सुट्या गोडेतेल विक्रीवर बंदी आहे. ही बंदी तुकाराम मुंढे यांनी प्रत्यक्षात आणल्यामुळे त्यांच्यावर नाराजी आहे आणि ती साहजिकच आहे. कारण राज्यातील आदिवासी, कातकरी तसेच अनेक गरीब घटक आहेत जे रोजचे तेल तसेच मीठ–मोहरी विकत घेऊन उदरनिर्वाह करत असतात. सुट्या तेलावरील बंदीमुळे या घटकांचे हाल झाले आहेत. पण सुट्या तेलात निकृष्ट दर्जाचे पामतेल, सोयाबिन तेल, जुने तसेच खराब तेल प्रक्रिया करून त्यांची भेसळ केली जाते. त्यामुळे सुट्या तेलविक्रीत किती धोके आहेत, हे लक्षात येते. अशीच भेसळ मैदा, पेढे, मिठाई, गव्हाचे पीठ आदी अनेक पदार्थांमध्ये आणि वस्तूंमध्ये केली जाते. या दोन्ही प्रकारच्या भेसळींमुळे अनेक तोटे होतात. अन्नपदार्थांमधील भेसळीमुळे शरीरावर दुष्परिणाम होतात. आरोग्य बिघडते, दीर्घकालीन आजार होतात. तर विचारांच्या भेसळीमुळे आयुष्य भरकटून जाते, दिशाहिन होते. विशेष म्हणजे वैचारिक भेसळ झाल्यामुळे असे परिणाम होतात, हे कुणाच्या गावीही नसते.

अन्नातील भेसळ ओळखण्याच्या काही परीक्षा पद्धती आहेत. त्यामुळे अशा पदार्थांपासून आपण काही प्रमाणात वाचू शकतो. पण विचारांच्या भेसळीपासून कसे वेगळे होऊ शकतो, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. चुकीची माहिती देणे, वारंवार अशा पद्धतीने खोटे सांगायचे की ऐकणार्याला खरे वाटावे ही वैचारिक भेसळखोरांची लक्षणे आहेत. समाज माध्यमे म्हणजेच सोशल मीडियामुळे वैचारिक भेसळखोरांची चांगलीच चलती आहे. ही मंडळी फॅसिस्ट विचाराने काम करतात. समाजात भीती पसरवणे, राष्ट्रवादाच्या पडद्याआड हुकूमशाहीचा अजेंडा राबवणे, इतिहासाचे पुनर्लेखन आणि सोयीने इतिहासाचा संदर्भ देणे, धार्मिक वाद निर्माण करणे तसेच असुरक्षिततेची भावना निर्माण करणे असे उद्योग करण्यात ही मंडळी माहिर असतात. ही वैचारिक भेसळ अन्नातील भेसळीपेक्षा जास्त घातक आहे. या भेसळीमुळे कित्येक पिढ्या बरबाद होऊ शकतात. त्यामुळे ही भेसळ अत्यंत घातक आहे. गंभीर बाब म्हणजे दूध भेसळ करणारे तेलाचा वापर करताना बिनधास्त असतात, तर तेलात भेसळ करणारे बेसनचे पीठ खातात. म्हणजेच भेसळखोरांची ही साखळी सर्वांनाच भेसळीच्या जाळ्यात फसवते. यात भरडला आणि फसवला जातो तो सामान्य माणूस. हा माणूस पूर्ण किंमत मोजूनही त्याला भेसळयुक्त खावे लागते. वैचारिक भेसळीचेही असेच आहे. चुकीची माहिती आणि संदर्भ अशा पद्धतीने पेरले जातात की खोटी माहिती खरी वाटते. आणि खोटारडेपणा कळत असूनही माणूस हतबल होतो. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे अन्नातील भेसळ रोखण्यासाठी आणि राज्यातील जनतेला चांगले अन्न मिळावे यासाठी तुकाराम मुंढे यांच्यासारखा आयुक्त आक्रमक पद्धतीने काम करत आहेत. मात्र, वैचारिक भेसळ रोखण्यासाठी एखादे तुकाराम मुंढे समाजात येण्याची नितांत गरज आहे. नाहीतर वैचारिक दिवाळखोरीच्या गोंधळात सर्वसामान्यांचा हकनाक बळी जाईल. ते दिवसही आता फार दूर नाहीत!

# सत्यशोधन समितीचा एका आठवड्यानंतर येणार अहवाल

## कडेकोट सुरक्षेत जिल्हाकचेरीत बैठक पडली पार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** जिल्हा स्त्री रुग्णालयातील तीन नवजात बाळांच्या अपघाती मृत्यूस जबाबदार कोण, हे शोधण्यासाठी येथे आ लेल्या सत्यशोधन समितीने दिवसभर काथ्याकूट करीत चौकशी पूर्ण केली. शिवसैनिकांचा दबाव असल्यामुळे ऐनवेळी या समितीला स्थळ बदलवावे लागले. त्यामुळे डफरीन हॉस्पीटलमधील नियोजित बैठक सुरक्षा रक्षकांच्या निगराणीत जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात घेतली. दरम्यान या समितीला निष्कर्षाप्रत येण्यासाठी आठवडा लागेल, असे अध्यक्षांच्यावतीने सचिव जयंत मुळे यांनी सांगितले.



व्हेंन्टिलेटरच्या स्फोटानंतर लागलेल्या आगीत डफरीन हॉस्पीटलच्या एआयसीयूमधील तीन नवजात बालकांचा २२ ऑगस्टला मृत्यू झाला. दरम्यान या घटनेची सर्वंकष चौकशी करुन निष्कर्षाप्रत येण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आरोग्य सेवा विभागाचे आयुक्त डॉ. संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती गठित केली. त्यात २० सदस्य आहेत. या समितीने बुधवारी घटनास्थळाची पाहणी केली. अध्यक्ष व सदस्यांनी वेगवेगळ्या हॉस्पीटलमधील बालकांच्या प्रकृतीची माहिती घेतली.या समितीची बैठक डफरीनच्या कान्फरन्स हॉलमध्ये होणार होती. परंतु तिथे लोकप्रतिनिधींच्या भेटी, शिवसैनिकांच्या आंदोलनामुळे त्यांना तेथे बैठक घेणे शक्य नव्हते. त्यामुळे बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात घेतली. शिवसैनिकांनी तिथेही लक्ष्य करण्याचे ठरवले होते. त्यामुळे संभाव्यधोका लक्षात घेता राज्य राखीव दलाच्या तुकड्या तैनात होत्या. बैठकीत सर्वांची मते नोंदवली. चर्चेत जिल्हाधिकारी येरेकर यांनीही माहिती दिली. अहवालापूर्वी समिती बैठक घेणार असून, आठवडाभरात निष्कर्ष सरकारला कळवणार आहे.

स्त्री रुग्णालयात अपघातस्थळाची पाहणी करताना सत्य शोधन समितीचे अधिकारी.

काटकर यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाईत, संभाजीनगर येथील विद्युत विभागाचे एसई दयानंद बहात्रे व वैद्यकीय अभियंता मनीष मगरे, नागपूर येथील राष्ट्रीय अग्निशमन कॉलेजचे संचालक सुधीर इंगळे व एम्सचे डॉ. निशांत बानाईत, पुणे येथील डीएमइआरचे संचालक डॉ. सुशांत माने, विद्युत निरीक्षक गणेश कंदीकुरवार, मनपाचे मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीश हंबर्डे, अग्नीशमन सेवा अधीक्षक अजय पंधरे, महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, अकोला येथील जीव वैद्यकीय अभियंता नितीन सावळे, पुणे येथील पीएचआयचे संचालक डॉ. योगेंद्र सवई, आरोग्य उपसंचालक डॉ. वाकचौरे, पत्रकार गजानन मोहोड, मनपा उपायुक्त शिल्पा नाईक यांचा समावेश आहे. पुणे येथील आरोग्य उपसंचालक (परिवहन) जयंत मुळे हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

# पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. हटकर यांची बदली रद्द करा

## – ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७नांदगाव पेठ–** नांदगाव पेठ येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. देवराव हटकर यांची नुकतीच अचलपूर येथे पशुवैद्यकीय रुग्णालयात बदली करण्यात आली आहे. त्यामुळे डॉ. हटकर आठवड्यातील तीन दिवस अचलपूर येथे सेवा देत असून, उर्वरित केवळ तीन दिवस ते नांदगाव पेठ येथे सेवा देत आहेत. मात्र तीन दिवस परिसरात असलेल्या अनेक गावांमधील शेतकरी व पशुपालक पशुधनाच्या उपचारासाठी पुरेसे नाहीत. या पशुवैद्यकीय दवाखान्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. या ठिकाणी अन्य अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यापेक्षा डॉ. हटकर यांचीच पूर्णवेळ नियुक्ती करावी, अशी मागणी शेतकऱ्यांसह पशुपालकांनी जिल्हाधिकाऱ्यांनकडे केली आहे. डॉ. हटकर यांच्या कार्यकाळात पशुधनावरील विविध आजारांवर



उपचार करण्यासोबतच पशुवैद्यकीय शस्त्रक्रिया, रोगप्रतिबंधक लसीकरण, कृत्रिम रेतन तसेच विविध शासकीय पशुसंवर्धन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आल्याचे पशुपालकांनी सांगितले. विशेष म्हणजे, अनेक गुंतागुंतीच्या पशुशस्त्रक्रिया यशस्वीपणे करून अनेक मुक्या प्राण्यांचे त्यांनी प्राण वाचवले आहेत. त्यामुळे त्यांच्या उपचार पद्धतीवर पशुपालकांचा विश्वास निर्माण झाला असून, आपात कालिन परिस्थितीतही त्याच्या कडून मिळणाऱ्या सेवेमुळे अनेक पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पशुधन हे ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. अशा परिस्थितीत अनुभवी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची बदली झाल्यास पशुधनाच्या उपचारासाठी दूरवर जावे लागू शकते. आपातकालिन परिस्थितीत पशुवैद्यकीय सेवा मिळण्यास विलंब झाल्यास पशुधनाच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता पशुपालकांनी व्यक्त केली आहे. पशुवैद्यकीय दवाखाने, पशुधनाच्या समस्यांकडे लक्ष नाही : पशू वैद्यकिय दवाखान्यावर नांदगाव पेठसह आजूबाजूच्या १० ते १२ गावांतील पशूपालक अवलंबून आहेत. परिसरात दुधाळ जनावरांची संख्या मोठी असताना पशुवैद्यकीय सेवा मात्र आठवड्यातील निम्मे दिवस उपलब्ध असल्याने पशुपालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दवाखानाच नियमित सुरू राहत नसल्याने पशुवैद्यकीय सेवेचा उद्देशच बाधित होत असल्याची भावना पशुपालकांमध्ये आहे.

# प्रगती दिनेश कल्पेकर ठरली कौन बनेगा करोडपती ची यशस्वी स्पर्धक

## उद्याला होणार 'शो' प्रसारित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालया च्या अमरावती येथील विभागीय माहिती कार्यालयात लिपिक-नि-टंकलेखक पदावर कार्यरत कु. प्रगती दिनेश कल्पेकर हीने सोनी टिव्हीवरील कौन बनेगा करोडपती या बहुचर्चित, सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धात्मक कार्यक्रमात विविध काठिण्यपातळ्या पार करीत प्रवेशित होऊन बिगबी श्री अमिताभ बच्चन यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत तीन फे-या पूर्ण करून ५ लाखांचे मोठे बक्षिस पटकावले आहे. वाचन, मनन आणि स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाचा छंद जोपासलेल्या कु. प्रगतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रारंभी प्राथमिक प्रवेश फेरीत विविध कठीण चाचण्या व संगणकाद्वारे ठरपवोश्रू निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये कु. प्रगती हीने मारलेली धडक अत्यंत कौतुकास्पद व लक्षवेधी ठरली. त्यानंतर केबीसीच्या चमूकडून संपर्क साधून तिला स्पर्धेसाठी



बोलावले गेले. मागील आठवड्यात ही स्पर्धा खेळली गेली. प्रथम 'फास्टेस्ट बझर फर्स्ट' या चाळणी पद्धतीमध्ये केवळ काही मिलीसेकंदांचा फरकही कोणाची निवड होणार हे ठरवू शकतो.त्यामुळे अंतिम निकाल हा केवळ ज्ञानावर नव्हे, तर वेळेचे अचूक भान, क्षणातील प्रतिक्रिया आणि काही प्रमाणात नशिबावरही अवलंबून असतो. यातही ती अव्वल ठरली व बिगबीच्या समोरील हॉटसीटची ती मानकरी ठरली. कु. प्रगतीच्या कौन बनेगा करोडपती या स्पर्धेच्या चित्रीकरणाचे एपिसोड गुरुवार २७ ऑगस्ट आणि शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता सोनी टीव्हीवर दोन भागात प्रसारित होणार आहेत. अमरावतीकर आपण सर्वांनी एपिसोड नक्की पाहावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

# सण-उत्सव काळात ग्रामीण भागासाठी आक्षेपाहार्य गाणे वाजविण्यासंदर्भात मनाई आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती** ईद-ए-मिलाद, कावड यात्रा, श्रीकृष्ण जन्माष्टमी,दहिहांडी,पोळा,गणपती उत्सव कालावधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात आयोजित धार्मिक कार्यक्रमांदरम्यान चिन्हीत व आक्षेपार्ह गाणे व भडकाऊ भाषणांच्या क्लिप्स वाजविण्यास अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १६३ अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. २४ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२६ पर्यंत हा आदेश लागू राहणार असून उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सण-उत्सवादरम्यान विविध सोशल मिडीयावरून कोणत्याही धर्माच्या भावना दुखावून जातीय तेढ निर्माण होऊ नये याकरिता जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी आक्षेपाहार्य पोस्ट प्रसारीत करण्यास अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम



१६३ अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

**डॉल्बी सिस्टीम प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी**

येत्या काळात विविध धर्मीय सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक शांतता, पर्यावरण व सुरक्षिततेस बाधा उत्पन्न होऊ नये याकरिता जिल्ह्यातील ग्रामीण भागात आयोजित धार्मिक कार्यक्रमांदरम्यान डॉल्बी सिस्टीम लावून मिरवणुका काढण्यास डॉल्बी सिस्टीम मालक व चालकांसाठी अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १६३ अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

## विद्याभारती महाविद्यालयात

# 'क्लब मंथन'तर्फे प्रभावी वक्तृत्व कौशल्य कार्यशाळा उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच त्यांच्यात संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि प्रभावी वक्तृत्वकला विकसित व्हावी, या उद्देशाने विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे जनरल इव्हेंट मॅनेजमेंट सोसायटीच्या (जेम्स) 'क्लब मंथन'मार्फत इंग्रजी विभागाच्या वतीने 'प्रभावी वक्तृत्व कौशल्य' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेत विविध शाखांतील सुमारे ७५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'युथ फेस्टिव्हल-२६'च्या नॅशनल चॅम्पियन श्रावणी रोटे या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. सार्वजनिक व्यासपीठावर प्रभावीपणे विचार मांडताना आत्मविश्वास, आवाजातील चढ-उतार, देहबोली, नेत्रसंपर्क, योग्य शब्दयोजना आणि श्रोत्यांशी प्रभावी संवाद साधण्याच्या विविध तंत्रांविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.केवळ सैद्धांतिक माहिती न देता प्रत्यक्ष कृती आणि सरावाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वक्तृत्वकलेचे धडे देण्यात आले. प्रभावी वक्तृत्व हे केवळ भाषणकलेपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि व्यावसायिक जीवनाच्या जडणघडणीत त्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे श्रावणी रोटे यांनी सांगितले. विचार स्पष्ट, नेमके आणि परिणामकारकपणे मांडण्याची क्षमता प्रत्येक विद्यार्थ्याने विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. प्रज्ञा येनकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रमाबरोबरच संवादकौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासालाही तितकेच महत्त्व देणे



आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. मिथिलेश राठौर यांनीही समयोचित मार्गदर्शन केले.कार्यक्रमास डॉ. के. पी. शेकोकार तसेच मराठी विभागप्रमुख डॉ. गजानन बनसोड यांची प्रमुख उपस्थिती होती. बी.ए. विभागातील सेजल सस्से, मुशफेरा शहजिन, दीपिका यादव, तुबा खान, राजनंदिनी वानखडे, अल्बिना चिंचक, श्रेया उपाध्याय तसेच विज्ञान विभागातील गुंजन शेवतकर, निधी कलोरे, प्रयास खंडारे, गुंजन पिंपळते, भूमिका जायले आणि आस्था गावडे या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत आपल्या वक्तृत्वकौशल्याची चुणूक दाखविली.मार्गदर्शकांनी दिलेल्या सूचनांचा प्रत्यक्ष सराव केल्यामुळे कार्यशाळेला प्रशिक्षणात्मक स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीरंग देशमुख यांनी केले. विविध शाखांतील विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यशाळेला उत्साहपूर्ण वातावरण लाभले. सार्वजनिक वक्तृत्वाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बळकटी मिळाली असून, व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने ही कार्यशाळा उपयुक्त ठरली.

# गुणनियंत्रण विश्लेषणात जिल्ह्यातील सोयाबीन बियाण्यांचे १८९ नमुने अप्रमाणित

## बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीविरोध जिल्ह्यातून २ हजारांवर तक्रारी, कंपनी विरोधात एफआयआर दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती** सोयाबीन बियाण्यांच्या विश्लेषणासाठी जिल्ह्यातील ४६४ नमुन्यांपैकी ३८५ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून १७ ऑगस्ट पर्यंत यातील १८९ नमुने अप्रमाणित आढले आहेत. यासंदर्भात बियाणे उत्पादक कंपनीवर कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले असून याबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित वृत्तांची दखल घेण्यात आली आहे. सोयाबीन बियाण्यांच्या एकूण ३ हजार १५७ प्राप्त तक्रारींपैकी २ हजार ३२६ तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे. विविध कंपन्यांचे सोयाबीन बियाणे उगवले नसल्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी तसेच कंपन्यांवर कार्यवाही करण्याविषयी वृत्तपत्रांमध्ये विविध वृत्त प्रसारित झाले होते. याची कृषी विभागाने गंभीर दखल घेत जिल्ह्यात पुरवठा झालेल्या सोयाबीन बियाण्यांचे वितरकनिहाय,वाणनिहाय,लॉट निहाय माहिती आदी सादर करण्याचे आदेश बियाणे उत्पादक कंपन्यांना देण्यात आले. शेतकऱ्यांच्या तक्रारींची पाहणी विहित वेळेत होण्यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती गठित करण्यात आल्या. या समित्यांमार्फत प्रातिनिधिक स्वरुपात कंपनीनिहाय आणि लॉटनिहाय तक्रारींची




पाहणी सुरु असून उर्वरीत तक्रारींची पाहणी उपसमित्यांद्वारे करण्यात येत आहे. १७ ऑगस्ट पर्यंत घेतलेल्या जिल्ह्यातील ४६४ नमुन्यांपैकी ३८५ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून यातील १९६ नमुने प्रमाणित तर १८९ नमुने अप्रमाणि आढले आहेत. बियाणे उत्पादक कंपन्यांवर बियाणे कंपनी कायदा १९६६ आणि बियाणे अधिनियम १९६८ अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.एकूण प्राप्त झालेल्या ३ हजार १५७ तक्रारींपैकी २ हजार ३२६ तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये ११ ऑगस्ट २०२६ रोजी कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ज्या तालुक्यांमध्ये येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनी व इतर कंपनींविरुद्ध एकूण ४१ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनी विरुद्ध १० गुन्हे तर ईनोव्हेज ग्रो,इंदोर कंपनीवर ५, पार्श्व जेनेटीक्स, इंदोर कंपनीवर ५, श्री. सिड्स, खंडवा कंपनी २, ग्रिन गोल्ड ग्रीटेक १, रवि सिड्स ७, एस. के. बी सिड्स २, ग्रिन ग्री रिव्होल्युशन २, व्हिगर बायोटेक २, अंकुर सिंड्स २, ईगल सिड्स १, श्री. ओसवाल सिड्स १ आणि उत्तम सिड्सवर १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व गुन्ह्यांमध्ये पोलीस विभागाकडून तपास सुरु आहे.सोयाबीन बियाण्यांच्या तालुका स्तरावर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत ईनोव्हेज ग्रो,इंदोर कंपनीच्या २७३, पार्श्व जेनेटीक्स, इंदोर कंपनीच्या ११९, श्री. सिड्स, खंडवा कंपनी १०३, ग्रिन गोल्ड ग्रीटेक कंपनीच्या ६७१, रवि सिड्स कंपनीच्या १८२, एस. के. बी सिड्सच्या ४५ तक्रारी प्राप्त झाल्या असून या कंपन्यांचे बियाणे विक्री परवान्यांवर बियाणे कंपनी कायदा १९६६ आणि बियाणे अधिनियम १९६८ अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव निविष्ठा व गुण नियंत्रक संचालकांकडे पाठविण्यात आला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# महर्षी शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव सादर


## अपर आयुक्त संदीप गोलाईत यांची माहिती

### शाळा संचालकाने दिली खोटी माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

महर्षी पब्लिक स्कूलमधील विद्यार्थी राजेश बाबू बेठेकर याची १४ ऑगस्टला प्रकृती बिघडली होती. मात्र त्याला रुग्णालयात न नेल्याने तो १६ ऑगस्टला दुपारी २ वाजता शाळेतून गावाला गेला. दरम्यान त्याची प्रकृती जास्त बिघडल्यामुळे रुग्णालयात नेत असताना त्याचा मृत्यू झाल्याचे चौकशीत उघड झाले. यावरून आदिवासी अपर आयुक्त संदिप गोलाईत यांनी महर्षी शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव आदिवासी आयुक्तांकडे पाठविला आहे.

अमरावती रिंगरोडवरील महर्षी पब्लिक स्कूल येथे इंग्रजी माध्यम नामांकित निवासी शाळा सुरू आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजी



भाषेचे ज्ञान असावे, त्यांची प्रगती व्हावी, या उद्देशाने ही योजना गेल्या काही वर्षापासून राज्यात सुरू आहे. मेळघाटातील एकूण ५४५ आदिवासी विद्यार्थी महर्षी शाळेत शिकत आहेत. वर्षाला एका विद्यार्थ्यामागे शाळेला ७० हजार रुपये अनुदान मिळते. त्यातून विद्यार्थ्यांच्या राहण्याची, जेवणाची तसेच गणवेश आणि शैक्षणिक साहित्याची व्यवस्था शाळेला करावी लागते. राजेश बेठेकर हा महर्षी शाळेत ११ वी ला शिकत होता. १४ ऑगस्ट रोजी त्याची प्रकृती बिघडल्यामुळे त्याने भावाला फोन करून सांगितले आणि शाळेच्या अधिक्षकाला माहिती दिली. परंतु शाळेच्या अधिक्षकांनी व संचालकाने कुठलीच दखल घेतली नाही. त्याची प्रकृती जास्त बिघडली. अखेर १६ ऑगस्ट ला त्याचा मृत्यू झाला.घटनेची गँभिर दखल घेतआयुक्त संदिप गोलाईत यांनी दुसऱ्याच दिवशी शाळेची पाहणी केली आणि शाळा संचालक प्रशांत राठी यांच्याकडे चौकशी केली असता राजेशची प्रकृती बिघडल्यानंतर तो कोणाला न सांगता १४ ऑगस्टला शाळेतून गावी निघून गेला, अशी खोटी माहिती त्यांनी आदिवासी आयुक्तांना दिली. त्यावरून आयुक्तांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्या चौकशीत महर्षी शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना सर्वसामान्य विद्यार्थ्यांसोबत बसविले जात नाही. विद्यार्थ्यांसोबत भेदभाव केला जातो, असा ठपका ठेवत महर्षी शाळेची मान्यता तत्काळ रद्द करण्यात यावी, असा प्रस्ताव आदिवासी अपर आयुक्त संदिप गोलाईत यांनी मंगळवारी आदिवासी आयुक्त मुंबई यांना पाठविला आहे.

> ■ राजेश बेठेकरला १४ ऑगस्टला रुग्णालयात नेले असते तर त्याचे प्राण वाचले असते. परंतु शाळेने त्याला रुग्णालयात दाखल केले नाही. उलट खोटी माहिती देत दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. तसेच शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांसोबत भेदभाव केला जातो, त्यांना सर्वसामान्य विद्यार्थ्यांसोबत शिकवीले जात नाही आणि शाळेचा रेकॉर्ड सुध्दा व्यवस्थीत नाही. त्यामुळे शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवीला आहे.
>
> – **संदिप गोलाईत,** अप्पर आयुक्त आदिवासी

# गोट्या खेळताय का? पोकलेन आणा, कोण आडवं येतंय बघू!

### इर्विनजवळील तुंबलेल्या नाल्यावरून आयुक्तांवर आमदार प्रवीण पोटे भडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) भीषण अग्निकांडानंतर रुग्णालयाची सुरक्षा आणि पायाभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी डफरीन व इर्विन रुग्णालय परिसरात पाहणीसाठी आलेल्या भाजप नेत्यांच्या शिष्टमंडळासमोर एका गंभीर समस्येचा खुलासा झाला. जिल्हा सामान्य रुग्णालया (इर्विन) मागून जाणाऱ्या मुख्य नाल्याची सफाई व खोलीकरण न झाल्यामुळे परिसरात सातत्याने पाणी तुंबत असल्याचे समोर आल्यावर, भाजप आमदार प्रवीण पोटे पाटील यांचा पारा चढला आणि त्यांनी अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांना फोनवरून चांगलेच खडे बोल सुनावले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी लोकप्रतिनिधींना सांगितले की, रेल्वे स्टेशनच्या मागे सुरू असलेल्या बांधकामामुळे इर्विन रुग्णालयाच्या मागचा मुख्य नाला तुंबला आहे. यामुळे मालवीय चौक, वालकट कंपाऊंड आणि डफरीन रुग्णालय परिसरात थोड्याशापावसानेही



पाणी साचते. यासंदर्भात कोणतीही कारवाई झाली नाही.डॉ. अनिल बोंडे यांनी तात्काळ ही माहिती मिळताच खासदार मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांना कॉल केला आणि फोन स्पीकर मोडवर ठेवला.समाधानकारक उत्तर न मिळाल्याने मनपा आयुक्तांकडून स्पष्ट व आमदार प्रवीण पोटे पाटील भडकले. ते म्हणाले, रुग्णालय प्रशासन वारंवार पत्रव्यवहार करत असताना तुम्ही काय खुर्चीवर बसून गोट्या खेळत आहात का? पोकलेन घेऊन या आणि नाला रिकामा करा! कोण आडवं येतंय तेच आम्ही बघतो.मनपा अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता नाला तातडीने रिकामा करून पाणी तुंबण्याची समस्या निकाली काढावी, असा स्पष्ट इशारा लोकप्रतिनिधींनी यावेळी मनपा प्रशासनाला दिला.भाजपच्या शिष्टमंडळातराज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे पाटील, आमदार प्रवीण तायडे आणि महापौर श्रीचंद तेजवानी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# परतवाडा चौपदरीकरणासाठी नागरिकांचा निर्धार; आंदोलनाची दिशा ठरली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७परतवाडा**

सततची वाढती वाहतूक, अपघातांचा धोका आणि प्रवाशांची गैरसोय, यामुळे संवेदनशील बनलेल्या अमरावती–परतवाडा मार्गाच्या चौपदरीकरणासाठी आता नागरिकांनी आंदोलनाची हाक दिली आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवत सर्वपक्षीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार केला. २३ ऑगस्ट रोजी स्थानिक विश्रामगृहात झालेल्या बैठकीत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाची दिशा, जनजागृती आणि पुढील रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी नागरिक कृती समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी जितेंद्र रोडे, तर सचिवपदी प्रमोद डेरे यांची निवड करण्यात आली. समितीच्या उर्वरित पदाधिकाऱ्यांची निवड लवकरच करण्यात येणार आहे.

अमरावती–परतवाडा मार्ग हा परिसराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढती वाहतूक, अपघातांचा धोका आणि प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता या मार्गाचे चौपदरीकरण आता केवळ मागणी राहिलेली नसून जनतेच्या सुरक्षिततेचा प्रश्न बनला आहे, असा सूर बैठकीत उमटला. संजय जोशी, सतीशकुमार व्यास, हर्षद चव्हाण, अजय अग्रवाल, संतोष नरेडी, राजकुमार महल्ले, अरविंद घोम यांच्यासह उपस्थितांनी आपापली भूमिका मांडत शासनाच्या उदासीनतेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. 'अमरावती–परतवाडा मार्गाचे चौपदरीकरण झालेच पाहिजे', अशा घोषणांनी बैठकीचा परिसर दुमदुमून गेला. आगामी काळात शहरासह परिसरातील नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी करून घेत व्यापक आणि तीव्र जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीला संजय जोशी, सतीश व्यास, संतोष नरेडी, अजय अग्रवाल, हर्षद चव्हाण, राजकुमार महल्ले, विजय गोंडचवर, विश्राम कुळकर्णी, अरविंद घोम, निलकंठ गावंडे, गोवर्धन मेहरे, संतोष भालेराव, दीपक तायडे, गजानन पोरे, सचिन करडे, अजय अग्रवाल, श्रीकांत राजूरकर, विलास उदापूरकर, अनिल चऱ्हाटे, दिवाकर किटुकले, मुरलीधर ठाकरे, कैलास पेंढारकर, पदमाकर घोगरे, पंकज गुप्ता, डॉ. हर्षद मडघे, प्रीतेश अवघड, बंडू घोम, शुभम बरडे, जय हावरे, इम्मानूएल चव्हाण, विजय सोसे, विलास लांडे, सागर डांगे, विनोद इंगळे, नीलेश राऊत, संजीव डागा, अभिजित पडोळे, डॉ. कौस्तुभ ठाकरे, मधुकर नाकट, डॉ. विजय मोहोड, गिरीश दौलतानी, विजयकुमार थावानी, आशिष तायडे, निखिल जाधव, प्रा. साहेबराव दामोदरे, ड. दादा टाले, मोनू सुळे, सानू खान, इमरान अहमद खान, वसीम सुलतानी, भानुदास वानखडे, हरिदास धोटे आदी उपस्थित होते.

# २५३ पानटपऱ्यांवर धडक कारवाई!

### ऑपरेशन कवच' अंतर्गत पोलिसांचा दणका



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२७अमरावती**

शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर पूर्णपणे नशामुक्त आणि तंबाखूमुक्त करण्यासाठी अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात ऑपरेशन कवच' ही विशेष मोहीम राबवली जात आहे. त्या अभियानाअंतर्गत शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटरच्या क्षेत्रात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर धडक कारवाई केली जात आहे.जिल्ह्यातील ३१ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत येणाऱ्या शाळा व महाविद्यालय परिसरातील तब्बल १२५३ पानटपऱ्यांची तपासणी करून त्यांच्यावर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. शाळाच्या १०० मीटरच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा, सिगारेट किंवा कोणतेही नशीले पदार्थ न विकण्याचे सक्त निर्देश परिसरातील किराणा दुकानदारांना देण्यात आले आहेत. सर्व ३१ पोलीस ठाण्यांचे अधिकारी व कर्मचारी आपापल्या हद्दीतील शाळा–कॉलेज परिसरात सतत गस्त घालत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करत आहेत.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी नागरिकांना, पालकांना, शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना वा मोहिमेत सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. शाळा किंवा महाविद्यालय परिसराच्या आसपास कुठेही तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा किंवा सिगारेटची विक्री होताना आढळल्यास, त्याविषयीची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.–

# मेळघाट मधील २३ गावांच्या विकासासाठी प्रशासनाचा कृती आराखडा

### चिखलदऱ्यातील प्रकल्पांचा सीईओंनी घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती–** मुख्यमंत्री कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या एकात्मिक ग्रामविकास प्रकल्प २.० अंतर्गत चिखलदरा तालुक्यातील सात ग्रामपंचायतींमधील २३ गावांच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी सुरू असलेल्या कामांना अधिक गती देण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी दिले. प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी त्यांनी मंगळवारी (ता. २६) चिखलदरा तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यात शहापूर, सलोना, भुलोरी, खडीमल, मोथा, गौलखेडा बाजार व खटकाली या ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या २३ गावांमध्ये प्रकल्पाच्या सहा उद्दिष्टांच्या अनुषंगाने झालेल्या कामांचा आणि प्रलंबित गरजांचा आढावा घेण्यात आला. ग्रामपंचायत शहापूर येथे सायंकाळी आढावा बैठक घेण्यात



> ■ मेळघाटातील २३ गावांचा विकास केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित न ठेवता शिक्षण, आरोग्य, कागदपत्रांची उपलब्धता, पाणी, वीज, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता यासर्व अंगांनी करण्यासाठी आयव्हीडीपी २.० हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे.
>
> *–**सत्यम गांधी,*** मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प.

आली. बैठकीच्या प्रारंभी शुभम वरखडे व गटविकास अधिकारी विनोद खेडकर यांनी प्रकल्पांतर्गत करण्यात आलेल्या बेसलाईन सर्वेक्षणाची माहिती, त्यातून निश्चित झालेल्या गावनिहाय गरजा आणि त्यानुसार पूर्ण करण्यात आलेल्या कामांचे सादरीकरण केले. यामध्ये अंगणवाडी दुरुस्ती, शाळांना संरक्षण भिंती, मोथा येथील शाळेतील स्वच्छतागृह, आलाडोह, लवादा, शहापूर येथील शाळांमध्ये सौरऊर्जा सुविधा व रंगरंगोटी, तसेच झिंगापूर आणि खडीमल येथे नागरिकांना आवश्यक कागदपत्रे मिळवून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिरांचा आढावा घेण्यात आला.

# जिल्हा परिषद शाळेत अज्ञातांनी फेकली विष्ठा

### प्रचंड दुर्गंधीमुळे वर्ग भरविणे अशक्य, विद्यार्थ्यांचा पटांगणात भरला वर्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर –**

तालुक्यातील सामदा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत अज्ञातांनी वर्गात तसेच मुख्य दरवाजाच्या कुलूपावर विष्ठा लावून घृणास्पद कृत्य केल्याचा प्रकार सकाळी उघडकीस आला. सर्वत्र दुर्गंधी पसरल्याने विद्यार्थ्यांना वर्गात बसविणे शक्य झाले नाही. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा वर्ग शाळेच्या पटांगणात भरविला होता. सोमवारी सकाळी शाळा उघडल्यानंतर शिक्षक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. वर्गात तसेच मुख्य दरवाजाच्या कुलूपावर विष्ठा लावण्यात आली होती. त्यामुळे शाळेच्या परिसरात अस्वच्छता निर्माण होऊन तीव्र




दुर्गंधी पसरली होती. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून वर्गाऐवजी पटांगणात अध्यापन करण्यात आले. शाळा प्रशासनाने तातडीने स्वच्छता करून घेतली. या घृणास्पद प्रकारामुळे गावात संतापाचे वातावरण आहे. अज्ञातांनी हे कृत्य कोणत्या उद्देशाने केले, याबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही. शिक्षण विभाग आणि पोलिस प्रशासनाने घटनेची गंभीर दखल घेऊन तपास सुरू केला आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर चोरपगार यांनी याप्रकाराचा निषेध करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. सामदा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत सकाळी हा प्रकार शिक्षकांच्या लक्षात आला. चिमुकल्यांच्या शाळेत अशाप्रकारे विष्ठा फेकून काय साध्य करायचे आहे, हा प्रश्न आहे. अशा घृणास्पद कृत्याची चौकशी करून दोषींना शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. घटनेमागील कारण आणि कृत्य करणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून परिसरातील माहिती घेतली जात आहे.

# परतवाड्यात मेळाव्याला युवकांचा प्रतिसाद

### तालुक्यातील ६२८ उमेदवारांना मिळाली प्राथमिक नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ परतवाडा**

स्थानिक कल्याण मंडपम् येथे आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याला बेरोजगार युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध कंपन्यांकडून जवळपास ६२८ उमेदवारांना प्राथमिक नियुक्ती देण्यात आल्याने रोजगाराच्या शोधातील युवकांना मोठा दिलासा मिळाला. मेळाव्यात १६ हून अधिक नामांकित खासगी क्षेत्रातील उद्योजकांसह मुख्यमंत्री जनकल्याण व कौशल्य विकास योजनेतील पाच नियोक्ते सहभागी झाले होते. सुमारे ४५० पदांसाठी



८०० हून अधिक उमेदवारांनी उपस्थिती नोंदविली. विविध आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी मिळण्याच्या उद्देशाने युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मंचावर आमदार प्रवीण तायडे, आमदार केवलराम काळे, माजी राज्यमंत्री तथा राज्यस्तरीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष रणजित पाटील, अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष किरण पातूरकर, जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, कौशल्य विकास विभागाचे उपआयुक्त डी. एल. ठाकरे, नगराध्यक्ष रूपाली माथने आदी उपस्थित होते. यावेळी अहिल्यादेवी प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य दिनेश उघडे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

रोजगार मेळाव्याचे आयोजन व संयोजन सहायक आयुक्त (कौशल्य विकास विभाग) प्रांजली बारस्कर, कौशल्य विकास अधिकारी अभिषेक ठाकरे, कनिष्ठ कौशल्य विकास अधिकारी सुभाष गुल्हाने, संदीप यादव, श्री. अरगुलेवार आणि दिनेश उघडे यांच्या नियोजनातून करण्यात आले. त्यांच्या नियोजनामुळे मेळावा यशस्वीपणे पार पडला.

# साथ रोग नियंत्रण करिता आरोग्य विभागाची व स्वच्छता विभागाची जम्बो बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती महानगरपालिका क्षेत्रात सर्व आरोग्य केंद्र व संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील झोन कार्यालय अंतर्गत असलेले स्वच्छता निरीक्षक तसेच आरोग्य निरीक्षक आरोग्य सेवक यांची आयुक्त डॉ मंगेश गोंदवले ,शिल्पा नाईक अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी व स्वच्छता वैद्यकीय अधिकारी डॉ अजय जाधव, डॉ. रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व मनपा कार्यालयातील आरोग्य सेवक व स्वच्छता निरीक्षक यांना सूचना केले की सदर आरोग्य विभाग व स्वच्छता विभाग यांनी समन्वय साधून ज्या ज्या ठिकाणी साथीचे आजार डेंगू मलेरिया चिकन गुनिया मेंदू ज्वर व इतर आजार



पसरू नये त्या ठिकाणी आरोग्य विभागाच्या वतीने घरोघरी गृह भेटी देऊन कंटेनर तपासणी करणे ,दूषित कंटेनर नष्ट करणे ,गप्पी मासे सोडणे, त्यांनी टॉमी फास ऍक्टिव्हिटी करणे ,तापाचे रुग्ण शोधणे ज्या ठिकाणी तापाचे रुग्ण आहे त्यांचे रक्ताचे नमुने घेणे त्यांच्या रिपोर्ट सादर करणे,पिण्याचे पाणी योग्य आहे किंवा नाही याची खात्री करणे व त्याच्यावर कार्यवाही करणे ,आपल्या आरोग्य केंद्रातून डेंगू मलेरिया, चिकन गुनिया साथीच्या आजारावर जनजागृती करून जनतेमध्ये स्वच्छता राखण्याची अपील करणे असे डॉ. विशाल काळे आरोग्य अधिकारी यांनी सर्वांना सांगितले तसेच डॉ.अजय जाधव यांनी स्वच्छता अधिकाऱ्यांना व निरीक्षकांना सांगितले की ज्या ज्या ठिकाणी आरोग्य निरीक्षक व आरोग्य सेवक आपल्यासोबत येऊन ज्या ठिकाणी डेंगू मलेरियाची रुग्ण आढळतात त्या ठिकाणी फवारणी धुवराणी करावी व आजूबाजूच्या परिसरात सुद्धा टीम टाकून रुग्ण शोध मोहीम घेऊन त्या ठिकाणी योग्य ती कारवाई करावी यामध्ये कोणतीही हय गय करू नये अशा स्पष्ट सूचना दिल्यात

तसेच डॉ.रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांनी सुद्धा सर्व आरोग्य निरीक्षक आरोग्य सेवक स्वच्छता निरीक्षक यांना आपल्या केलेल्या कामाचा अहवाल दैनंदिन सादर करावा साथीचे उद्रेक कसा होतो हे समजून सांगितले व कुठे काही अडचण असल्यास वरिष्ठांची संपर्क साधून त्या कामाचे निराकरण करावे व साथीचे आजार पसरू नये यासाठी मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले, शिल्पा नाईक अतिरिक्त आयुक्त , उपायुक्त वैशाली बोरेकर तसेच वैद्यकीय आरोग्य डॉ. विशाल काळे तसेच स्वच्छता अधिकारी डॉ.अजय जाधव यांनी साथीचे रोग नियंत्रण करण्यासाठी सर्वांना स्पष्ट आदेश दिले आणि ह्या कार्यक्रमाचे सर्वांनी तात्काळ अमल बजावणी करावी अशा सूचना देण्यात आल्यात.

# अर्भकांच्या मृत्यूचे गलिच्छ राजकारण नको


## सुषमा अंधारेंच्या वक्तव्याचा निषेध - खासदार डॉ. अनिल बोंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

सर्वत्र वचवच बोलणाऱ्या सुषमा अंधारे यांनी जिल्हा महिला रुग्णालयातील नवजात अर्भकांच्या आयसीयू ला लागलेल्या आगेत तीन अर्भकांचा मृत्यू होण्याच्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या अत्यंत दुर्दैवी घटनेचे केविलवाणे व गलिच्छ राजकारण सुरु केले असून त्यांच्या वक्तव्यांचा आम्ही निषेध करतो, अशी प्रतिक्रिया भाजपाचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिली आहे.

आज आयोजित पत्रकार परिषदेत खासदार डॉ. अनिल बोंडे बोलत होते. यावेळी आ. प्रवीण पोटे पाटील, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, किरण पातूरकर, चेतन पवार प्रामुख्याने उपस्थित होते. काल सुषमा अंधारे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर टीका केली. त्यावर उत्तर देताना खासदार डॉ. अनिल बोंडे बोलत होते.

जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांनी सामान्य भाजीपाला विकणारे लोक देखील यूपीआय म्हणजे कॅशलेस व्यवहार करतील अशी अपेक्षा व्यक्त केली तेव्हा माजी मंत्री पी चिदंबरम यांनी त्यावर आक्षेप घेतला होता. काँग्रेसजनांनी व विरोधकांनी या धोरणावर टीका केली होती. आज यूपीआय द्वारे व्यवहार रूढ झाला आहे. या निर्णयाच्या दशकपूर्ती निमित्त रस्त्याच्या कडेला पाणीपुरी विकणारा सामान्य विक्रेता देखील यूपीआय वापरतो, हे दर्शवण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाणीपुरी खाऊन त्याच्याशी कॅशलेस व्यवहार केला. यावर टीका हास्यास्पद आहे. केवळ सनसनाटी उभी करणे हा त्यांचा उद्देश होता. आरोग्य आयुक्तांच्या तोंडाला काळे फासून बातम्या खेचण्याचा त्यांचा उद्देश होता. उद्धव ठाकरे यांनी अशा वाचाळ अंधारेना संवेदनशील ठिकाणी पाठवू नये असे डॉ. बोंडे यांनी स्पष्ट केले.




भाजपाने स्वतःची अधिकृत दहीहंडी रद्द केली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्याचे कौतुक केले. आता आमचे नाव अमरावतीत अन्य कोणीही आपल्या उपक्रमाला लावू नये किंवा वापरू नये अशी आमची जाहीर सूचना असल्याचे ही भाजप च्या वतीने सांगण्यात आले.

डॉ. बोंडे पुढे म्हणाले, २४ ऑगस्टला पहाटे ही दुर्घटना घडली तेव्हा पहाटे पाच वाजे पासूनच पालकमंत्री अमरावती जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात होते. क्षणाक्षणाला त्यांनी प्रशासनाला युद्धस्तरावर हालचाली करण्याचे निर्देश दिले. या अपघातातील सहा नवजात अर्भके खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. सोबतच रुग्णालयातील उर्वरित ३० बाळांना तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल करण्याचे व त्यांच्यावर शासकीय खर्चाने उपचार करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी तात्काळ दिले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पहाटे राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्याचे सार्वजनिक आरोग्य सचिव यांच्याशी संवाद साधला. या प्रकरणी अपघाताची चौकशी करणे, काही घातपात आहे का याचा तपास करणे, मृत नवजात बालकांच्या कुटुंबियांना निकषानुसार शासकीय मदत करणे आणि पुन्हा अशा प्रकारची घटना घडणार नाही, अशा प्रकारची व्यवस्था उभी करणे, अशा सर्व सूचना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्या क्षणी दिल्या आहेत. या दुर्दैवी घटनास्थळाला भेट देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्याचे सार्वजनिक आरोग्य सचिव यांनी तात्काळ पोहचण्याची व्यवस्था पालकमंत्र्यांनीच केली. शासनाकडून घटनेची गंभीर दखल घेण्यात आली असून यात कोणी दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाणार असल्याचे देखील पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे प्रकरण अतिशय गंभीरतेने घेतले असल्याचे डॉ बोंडे म्हणाले.



# भांबोरात वाघाचा कहर!

# शेतकऱ्यावर हल्ला करून घेतला जीव

## परिसरातील शेतशिवारात प्रचंड भीतीचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७ भांबोरा**

मोर्शी तालुक्यात बिबट्याच्या व वाघाच्या हल्ल्याच्या घटना काही केल्या थांबण्याचे नाव घेत नाही. तालुक्यातील भांबोरा गावच्या शेत शिवारातील शेतात काम करत असताना वाघाने केलेल्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गुरुवार रोजीसकाळी अकरा वाजताच्या सुमारास चरणदास ईखे वय ५५ वर्ष राहणार भांबोरा हा शेतकरी आपल्या शेतात नेहमीप्रमाणे काम करत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी झाला आणि रक्तस्त्राव जास्त झाल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे संपूर्ण भांबोरा आणि परिसरातील व सिंभोरा तुळजापूर येवती आष्टी आदी गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.घटनेची माहिती मोर्शी वनविभागाला देण्यात आली असून वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. व नरभक्षक वाघाचा ड्रोन कॅमेराच्या मदतीने शोध सुरू केला आहे. मुतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.



यावेळीग्रामस्थांनी वनविभागाकडे मागणी केली आहे की, या नरभक्षक वाघाला तात्काळ जेरबंद करण्यासाठी शिवारात पिंजरे लावावेत. मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाच्या नियमानुसार तात्काळ आर्थिक मदत द्यावी.तसेच रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात.गेल्या काही महिन्यांपासून मोर्शी तालुक्यात बिबट्याचा व वाघाचा वावर वाढला असून. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना बिबट्या दिसला आहे. वनविभागाने वेळीच उपाययोजना केली नाही तर अजून जीव जाण्याची शक्यता आहे, असे संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, या घटनेमुळे शेतकरी सकाळी लवकर आणि संध्याकाळी उशिरा शेतात जाण्यास घाबरत आहेत.

## जिल्हा स्त्री रुग्णालयातील हॉस्पिटलमधील

# जळीत कक्षाला अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सील कक्ष बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती :**



जिल्हा स्त्री रुग्णालयातील हॉस्पिटलमधील जळीत कक्षाला आज, गुरुवारी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या समक्ष अधिकृतपणे सील लावून बंद करण्यात आले. अलीकडील गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याने रुग्णालय प्रशासनात खळबळ उडाली आहे.आज सकाळी संबंधित विभागातील अधिकारी, रुग्णालय प्रशासनाचे प्रतिनिधी तसेच कर्मचारी यांच्या उपस्थितीत जळीत कक्षाची पाहणी करण्यात आली. त्यानंतर आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून कक्षाला सील लावण्यात आले. या कक्षात पुढील आदेश येईपर्यंत कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सेवा अथवा इतर कामकाज होणार नसल्याची माहिती मिळत आहे.घटनेच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांकडून चौकशी सुरू असून, जळीत कक्षातील उपकरणे, व्यवस्थापन तसेच सुरक्षा व्यवस्थेची तपासणी केली जाण्याची शक्यता आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कक्ष बंद ठेवण्यात येणार असल्याचे समजते.



# अमरावतीत धनगर समाजाचा एल्गार

## मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात...

### उपोषण मंडपात हजारो मेंढपाळांचा पाठिंबा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर धनगर नेते सामाजिक कार्यकर्ते अर्जुन महानर यांनी धनगर समाजाच्या विविध मागण्या संदर्भात अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे.. त्यांच्या या आंदोलनाला हजारो मेंढपाळांनी पाठिंबा देत उपोषण मंडपात एकच गर्दी केली आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात मेंढी चराई शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, राज्य शासनाने काढलेल्या २४ ऑगस्ट रोजी शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी..स्थानिक परिस्थितीनुसार उपलब्ध होणाऱ्या वनक्षेत्रात चराईची परवानगी देण्याचे निर्देश द्यावे, सर्व जिल्ह्यांमध्ये मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेले वनक्षेत्र, गायरान, ए-उश्ररीी, झुडपी व पडीक जमीन तात्काळ निश्चित करून त्याची तालुकानिहाय यादी जाहीर करावी. यापूर्वी वनमंत्री गणेश नाईक आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत झालेल्या मुंबईत बैठकीमध्ये राज्य सरकारने मेंढपाळ बांधवांसाठी जीआर काढला मात्र त्याची अंमलबजावणी नीट केली जात नाही असा आरोप करण्यात आला त्यामुळे यान शासन निर्णयाची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी करावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन महानर यांनी अमरावतीमध्ये अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे..

# गवळाऊ गायीच्या शेणापासून तयार होणार इको-फ्रेंडली गणपती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७वर्धा-** शाडूच्या मातीपासून तयार केलेली गणेश मूर्ती की प्लास्टिक ऑफ पॅरिसची मूर्ती, यात सोयीचे काय हा एक मुद्दा व पर्यावरण सुरक्षा हा दुसरा मुद्दा. हा खल चालूच आहे. पीओपी मूर्त्या या पाण्यात विघटनशिल नाहीत, म्हणुन त्यावर बंदीचा आग्रह पण तरीही त्याची विक्री सुरूच असल्याचे लपून नाही. मात्र या वादावर मत करणारा एक उपाय आता पुढे आला आहे. त्यात श्रद्धा आहेच आणि पावित्र्य पण. महिलांनी गणेश भक्त मंडळीसाठी हा पर्याय दिला आहे.पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील हेटीकुंडी येथे एक स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. 'गवळाऊ शासकीय पशु पैदास क्षेत्र, हेटीकुंडी' आणि



'गवळाऊ सेंद्रिय निविष्ठा महिला बचत गट, हेटीकुंडी' यांच्या संयुक्त विद्यमाने गवळाऊ गायीच्या गोमयापासून (शेणापासून) आकर्षक व इको-फ्रेंडली गणेशमूर्तींची निर्मिती करण्यात येत आहे. विदर्भाची ओळख वर्धेची माय, विदर्भाचे भूषण गवळाऊ गाय ही संकल्पना इकडे चांगलीच परिचित आहे. त्याच संकल्पनेला अधोरेखित करत हा उपक्रम राबवला जात आहे.पवित्र गोमय व नैसर्गिक रंगः या सर्व मूर्ती शुद्ध गवळाऊ गायीच्या शेणापासून बनवण्यात आल्या असून त्यांना सजवण्यासाठी नैसर्गिक रंगांचा वापर करण्यात आला आहे.देशी गवळाऊ गायींच्या संवर्धनाला आणि स्थानिक महिला रोजगाराला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आहे. तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष (उमेद), कारंजा (घाडगे) आणि जिल्हा वर्धा यांच्या सहाय्याने हा उपक्रम चालवला जात आहे. गवळाऊ सेंद्रिय निविष्ठा महिला बचत गट, शासकीय पशु पैदास क्षेत्र, हेटीकुंडी ता. कारंजा-घाडगे, जि. वर्धा यांच्यामार्फत नागरिकांना यावर्षी इको-फ्रेंडली गणेशमूर्तींची स्थापना करून पर्यावरण संवर्धनात हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्जमाफीच्या अटी शिथिल करा

## तिवसा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करा!

### सर्वपक्षीय नेत्यांचा तहसीलवर धडक मोर्चा; मुख्यमंत्र्यांच्या नावे तहसीलदारांना निवेदन





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ तिवसा :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना कोणत्याही जाचक व शेतकरीविरोधी अटी-शर्ती न लावता थेट सरकारी तिजोरीतून दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी तिवसा तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी गुरुवारी तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढून आंदोलन केले. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. तसेच पावसाअभावी निर्माण झालेली गंभीर परिस्थिती लक्षात घेता तिवसा तालुका तातडीने कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली.तिवसा येथील पेट्रोल पंप चौकात शेतकरी आणि विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र आले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर मोर्चाने तहसील कार्यालय गाठले. कार्यालयासमोरही घोषणाबाजी करत विविध नेत्यांनी सरकारच्या कर्जमाफी धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली.निवेदनात म्हटले आहे की, निसर्गाची अवकृपा, अस्मानी-सुलतानी संकटे आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे शेतकरी पूर्णपणे कोलमडला आहे. मागील खरीप हंगामातील नुकसानीची भरपाई अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेली नाही. मिळालेल्या तुटपुंज्या मदतीतून उसनवारीची परतफेड करणेही शक्य झाले नसल्याचा आरोप करण्यात आला. यंदाच्या खरीप हंगामासाठी अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून तसेच घरातील वस्तू विकून खर्च केला. मात्र, मागील दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने पिके सुकू लागली असून किडीचा प्रादुर्भावही वाढला आहे.सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीमुळे दिलासा मिळेल, अशी अपेक्षा असताना वन टाइम सेटलमेंट (ओटीएस) पद्धतीबाबत शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली. ओटीएसमुळे भविष्यातील आर्थिक पत आणि कर्ज मिळण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होऊ नये, यासाठी सरकारने स्पष्ट हमी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांऐवजी दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान, आयटीआरधारक व जुन्या कर्जमाफीपासून वंचित शेतकऱ्यांचा समावेश, मृत शेतकऱ्यांच्या कायदेशीर वारसांना लाभ आणि सिबिल स्कोअरचे संरक्षण या प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.मागण्या तातडीने मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही सर्वपक्षीय नेत्यांनी दिला. आंदोलनात प्रशांत कांबळे, अनिल थुल, वैभव वानखडे, श्रीराम देशमुख, प्रकाश सोनोने, सागर भवते, विश्वजीत बाकडे, रितेश पांडव यांच्यासह शेकडो शेतकरी व नागरिक सहभागी झाले.

# भाजप अमरावती शहर जिल्हा कोअर कमिटीची घोषणा

## संघटन बळकटीकरणावर भर, अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या अध्यक्षतेखाली कोअर कमिटी कार्यरत राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती :** भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बांधणीला अधिक मजबूत, गतिमान आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने भाजपा महाराष्ट्र प्रदेशाकडून अमरावती शहर जिल्हा कोअर कमिटीची घोषणा करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार प्रदेश महामंत्री संजय कुटे यांच्या स्वाक्षरीने २५ ऑगस्ट २०२६ रोजी या कोअर कमिटीचे गठन करण्यात आले. भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या अध्यक्षतेखाली ही कोअर कमिटी कार्यरत राहणार आहे.भारतीय जनता पार्टीमध्ये संघटनात्मक रचनेला विशेष महत्त्व असून, बूथपासून जिल्हास्तरापर्यंत पक्षाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी कोअर कमिटी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. आगामी काळात पक्षाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध संघटनात्मक कार्यक्रम, अभियान, जनसंपर्क उपक्रम तसेच सामाजिक कार्यक्रमांचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणी या समितीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.अमरावती शहरातील प्रत्येक भागात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, नवीन कार्यकर्त्यांना पक्षाच्या विचारधारेशी जोडणे आणि विद्यमान कार्यकर्त्यांमध्ये समन्वय निर्माण करणे, यावर विशेष भर दिला जाणार आहे. प्रत्येक बूथ, शक्तिकेंद्र आणि मंडळ पातळीवर संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि विकासाशी संबंधित प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचाही कोअर कमिटीचा प्रयत्न राहणार आहे. केंद्र व महाराष्ट्र राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविणे आणि लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे, यालाही प्राधान्य दिले जाणार आहे.सरकारच्या योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने भाजपा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती आणि जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार आहे.याप्रसंगी अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी कोअर कमिटीच्या सर्व नियुक्त पदाधिकाऱ्यांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश महामंत्री संजय कुटे तसेच पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त केले.




सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :